**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २९ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

**1. समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय**

**2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला ५ वर्ष पूर्ण, वाशीमच्या पी एम श्री केन्द्रीय विद्यालय नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीचे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन**

**3. सर्व पात्र लाभार्थ्यांना तिन महिन्यात मालकी हक्काचे पट्टे द्या --महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश, विविध महसूल विषयक बाबींचा घेतला आढावा**

**4. नागपूर सह भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि अमरावती मध्ये आज मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा इशारा**

**समृद्ध पंचायतराज**

राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबवून उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक आज झाली. या अंतर्गत एकंदर १ हजार ९०२ पुरस्कार देण्यात येणार आहेत. महिलांवरच्या अत्याचाराची प्रकरणं निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशीम इथं विशेष न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला. पिंपरी-चिंचवड इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय, आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अशा दोन न्यायालयांची स्थापना करायला, तसंच या न्यायालयांसाठीच्या पदांना मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. ग्रामीण भागातल्या महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद अभियानांतर्गत १० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल उभारायला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. ई-नाम योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन करण्यासाठी कृषी उत्पन्न पणन विकास आणि विनियमन अधिनियम, १९६३मध्ये सुधारणा करायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. वर्धा जिल्ह्यात बोर मोठा प्रकल्पाची दुरुस्ती आणि नूतनीकरणासाठी २३१ कोटी ६९ लाख रुपयांच्या, तर धाम मध्यम प्रकल्पाची दुरुस्ती आणि नूतनीकरणासाठी १९७ कोटी २७ लाख रुपयांच्या तरतुदीला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. फिडे महिला बुद्धिबळ विजेती ग्रॅंडमास्टर दिव्या देशमुख हिच्या अभिनंदनाचा प्रस्ताव आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.

**अमित शाह**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सहभागी तिन्ही दहशतवाद्यांना ठार मारण्यात भारतीय यंत्रणांना यश आल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकसभेत सांगितलं. ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. याबद्दल अधिक माहिती देताना ते म्हणाले,

***ऑपरेशन महादेव में सुलेमान उर्फ फैजल जट्ट ,अफगान और जिब्रान तीन आतंकवादी सेना,, सीआरपीएफ और जम्मू कश्मीर पुलिस के संयुक्त अभियान में ऑपरेशन महादेव में मारे गए।मैं सदन को और सदन के माध्यम से पूरे देश को बताना चाहता हूँ, जिन्होंने बैसरन घाटी में हमारे प्रवासियों को नागरिक को मारा था। ये तीनों आतंकवादी थे और तीनों मारे गए।***

लष्कर, जम्मू काश्मीर पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाने राबवलेल्या या ऑपरेशन महादेव मध्ये दोन जणांना अटक करण्यात आल्याचंही शहा यांनी सांगितलं. दहशतवादी हल्ला झाला, त्याठिकाणाहून जप्त केलेल्या काडतुसांच्या आधारे हे दहशतवादी सापडले असून, त्यांच्या घरच्यांकडून मृतदेहांची ओळख पटवल्याचंही त्यांनी सांगितलं. दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने केलेल्या प्रत्येक कारवाईबद्दल शहा यांनी सविस्तर माहिती दिली.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू होऊन आज पाच वर्षं झाली. देशातल्या शाळांची एक इमारत ही ओळख बदलून केवळ पुस्तकी शिक्षण, गुण आणि पाठांतर यांच्या पलिकडील ज्ञान मिळवण्याचं अवकाश अशी ओळख घडवण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा हा पथदर्शी आराखडा आहे. गेल्या पाच वर्षांत या धोरणामुळे अधिक समावेशक, विद्यार्थी केंद्रित आणि भविष्यासाठी अनुकूल शिक्षण पद्धतीचा पाया रचला गेला आहे. सर्व राज्यांमध्ये शिक्षण क्षेत्रात नवीन धोरणाचा प्रभाव दिसून येत आहे. पाच वर्षांच्या पूर्ती निमित्त आज केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे अखिल भारतीय शिक्षा समागम २०२५ चे आयोजन करण्यात आले. २०४७ भारतात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची भूमिका महत्वाची राहणार असल्याचे केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यावेळी म्हणाले. पी एम श्री केन्द्रीय विद्यालय वाशीमच्या नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीचे उद्घाटन आज, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे संपन्न झाले. या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, शिक्षण अधिकारी मंगल धुपे, महाविद्यालयाचे प्राचार्य झंवर यांच्यासह वाशीम शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अतिरिक्त प्रभार डीन वाणिज्य आणि प्राचार्य निकेतन महाविद्यालय डॉ मेधा कानेटकर यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि अमलबजावणीबाबत आपलं मनोगत व्यक्त केलं -

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 जे आपल्याकडे लागू झालेला आहे.त्यामुळे संपूर्ण भारतामध्ये एक सांस्कृतिक वैचारिक परिवर्तनाची लाट आलेली आहे.आज या धोरणाला पाच वर्षे पूर्ण झालेली आहे. या पाच वर्षांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांमध्ये होणारा जो बदल आहे. क्लासरूममध्ये शिकवल्या जाणाऱ्या भारतीय ज्ञान परंपरा या विषयामुळे विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीचं एक दर्शन तर होतंच आहे. पण भारत हा किती महान आणि किती प्रगत होता याबद्दलची ही माहिती मिळते आहे. त्याचबरोबर ती विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त होण्याकरिता म्हणूनच विषयानुरूप विषयावर आधारित असे अभ्यासक्रम तयार करण्यात आलेले आहे. त्याचाही विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होणार आहे.*

**अजित पवार**

आदिवासी विकास विभागाअंतर्गत पूर्ण झालेल्या कामांचा प्रलंबित दायित्व निधी तातडीनं वितरित करावा, त्याबाबतच्या मागणीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. आदिवासी विकास विभागाच्या विविध प्रलंबित विषयांबाबत अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. पूर्ण आणि प्रगतीपथावरचे रस्ते, पुलांची कामं, लेखाशीर्ष ३०५४ अंतर्गत रस्त्यांची कामं, ठक्कर बाप्पा योजना, शासकीय आदिवासी विभागातल्या इमारतींची बांधकामं, अधिसंख्य झालेल्या जागेवर विशेष भरती, राज्यभरातल्या आदिवासी आश्रम शाळेमध्ये रोजंदारीवर आणि तासिकेवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न आदी विषयांवर या बैठकीत चर्चा झाली.

**बावनकुळे**

पात्र आणि निकषात बसणाऱ्या सर्व अतिक्रमणधारक नागरिकांना मालकी हक्काचे पट्टे देण्याचे शासनाचे धोरण आहे. जिल्हयात सन २०११ पूर्वीच्या अशा सर्व अतिक्रमणधारकांना येत्या तिन महिन्यात पट्टे वाटप करा. पट्टे वाटपाबाबत शासन निर्णयात काही दुरुस्ती पाहिजे असल्यास करुन देऊ, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयात महसूलमंत्र्यांनी महसूल विषयक विविध कामांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस पालकमंत्री डॉ.पंकज भोयर उपस्थित होते.जमीनीचे शर्तभंग, नझूल जमीनी फ्री होल्ड करण्याची प्रकरणे तातडीने निकाली काढा. अशा प्रकरणात संबंधित जमीनधारकांकडे महसूल कर्मचाऱ्यांना पाठवून कागदपत्रांची पूर्तता करुन घ्या आणि त्यांना पट्टे वितरण करा. सिंधी समाजाच्या नागरिकांना पट्टे वाटपाचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, या समाजबांधवांच्या विशेष शिबिरांचे आयोजन करुन पट्टे वाटप करण्याचे निर्देश बैठकीत महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले.

**हवामान**

नागपूर सह भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर या जिल्हयांमध्ये आज मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून पश्चिम विदर्भातील अमरावती जिल्हयात देखील आज मुसळधार पावसाचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. याशिवाय उद्या संपूर्ण विदर्भात मेघगर्जनेसह वादळी पर्जन्यमान राहणार असल्याची शक्यता देखील

विभागाने वर्तवली आहे दरम्यान, गोंदिया जिल्ह्यात रात्री दमदार पाऊस बरसला असल्याने आणि अद्यापही जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाऊस येत असल्याने गोंदिया जिल्ह्यातील नदी-नाल्यासह धरणाच्या पाणी पातळीत कमालीची वाढ झाली आहे. देवरी तालुक्याच्या मध्यप्रदेश सीमेवर असलेल्या शिरपूर हा धरण सिंचनाच्या दृष्टिकोनातून महत्वाचा धरण असुन तुडुंब भरले आहे. त्यामुळे पाणी पातळी नियंत्रीत ठेवण्याकरिता धरणाचे 3 दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यातून 2231 क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे बाघ नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाद्वारे देण्यात आला आहे.

**व्याघ्र दिन**

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन आज साजरा केला जात आहे. दरवर्षी २९ जुलै रोजी हा दिवस जागतिक स्तरावर वाघांच्या नैसर्गिक अधिवासांचं जतन करण्यासाठी आणि जगभरातल्या संवर्धन प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी साजरा केला जातो. वाघ हा आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे; वाघांचं संरक्षण म्हणजे निसर्गाचं संतुलन टिकवणं आणि जीवनाचं खऱ्या अर्थानं रक्षण करणं असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त महाराष्ट्र वन मुख्यालयी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय "वनभवन" नागपूर येथे अर्पण स्वयंसेवक रक्त पेढी व येस हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नागपूर यांचे सौजन्याने रक्तदान आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

**अनिल देशमुख**

राजकीय विरोधकांचे खच्चीकरण करण्यासाठी सरकार जसा ईडीचा वापर करतो, तसाच वापर जनसुरक्षा कायद्याचाही होऊ शकतो, अशी भीती राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आज गडचिरोली येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केली.जो व्यक्ती सरकारविरोधात भूमिका मांडेल, त्याला अर्बन नक्षलवादी ठरविले जाईल. त्यामुळे सामान्य माणसाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सरकार या कायद्याच्या माध्यमातून करीत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांचा या कायद्याला विरोध आहे, असे अनिल देशमुख यांनी स्पष्ट केले शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करुन, बोनस द्यावा, मुबलक प्रमाणात खत उपलब्ध करुन द्यावे इत्यादी मागण्याही त्यांनी केल्या.

*****